# ‘शैक्षणिक साहित्य कर्ज नियम’ (लॅपटॉप / संगणक / मोबाईल खरेदी)

## (दि.२५/०८/२०२० पासुन लागू)

१. सदर नियमास **‘नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक’** चे **‘शैक्षणिक साहित्य कर्ज’ (Educational Equipment)** असे संबोधले जाईल.

२. सदर कर्ज फक्त नियमित सभासदास देण्यात येईल तसेच बँकेचा कायम सेवक देखील सदर कर्ज घेण्यास पात्र राहील तथापि त्यास ‘नाममात्र’ सभासद व्हावे लागेल.

३. सदरचे कर्ज शैक्षणिक कारणांसाठी लागणारे **लॅपटॉप, संगणक अथवा मोबाईल** खरेदीसाठी दिले जाईल.

४. शैक्षणिक कारणासाठी **लॅपटॉप, संगणक व मोबाईल** खरेदीबाबत संबंधीत विक्रेत्यांचे कोटेशन व संबंधीत पाल्याचे गुणपत्रक अर्जासोबत जोडावे लागेल.

५. मंजूर कर्जाची रक्कम परस्पर विक्रेता यांचे नावाने चेकने अथवा NEFT ने पाठविण्यात येईल ती कोणत्याही परिस्थितीत रोखीने अथवा बचत खातेवर जमा केली जाणार नाही.

६. सदरचे कर्ज वरील नमुद वस्तुंच्या कोटेशन रक्कमेनुसार किंवा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्याच रक्कमेस कर्ज मंजुरी दिली जाईल.

७. किमान रु. ५,०००/- इतके भाग भांडवल असणारे व नियमीत वर्गणी चालू असणारे सभासदच हे कर्ज घेण्यास पात्र राहतील.

८. कर्जाची मर्यादा किमान रु.५,०००/- व कमाल रु.५०,०००/- इतकी राहील.

९. सदर कर्जाची परतफेड ECS मार्फत करण्यात येईल. मात्र बँक कर्मचाऱ्यांची परतफेड त्यांच्या पगारातुन करण्यात येईल.

१०. कर्जाची परतफेडीची मुदत २४ महिने इतकी राहील, मात्र ती कोणत्याही परिस्थितीत सभासदाच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपेक्षा जादा राहणार नाही. सदरची परतफेड मासिक हप्त्याने राहील.

११. कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ११.००% इतका राहील. व्याज मासिक स्वरुपात खात्यावर नावे टाकले जाईल. कर्ज थकीत झाल्यास थकीत रकमेवर २% जादा ‘दंड’ व्याज आकारले जाईल.

१२. कर्जास जामीनदाराची आवश्यकता नाही मात्र सभासदाने यापुर्वी कर्ज घेतले असल्यास सदरचे कर्ज नियमित असावे. ते थकीत असल्यास किंवा मागील कर्जाच्या परतफेडीचा अनुभव समाधानकारक नसल्यास हे कर्ज दिले जाणार नाही.

१३. कर्जास रु.१००/- चा स्टॅम्प पेपर कर्ज करारनाम्यासोबत स्वाक्षरीनीशी जोडावा लागेल.

१४. कर्ज मुदतीत न भरल्यास अथवा थकीत झाल्यास ते सभासदांच्या इतर ठेव खात्यातुन वर्ग करुन बंद करण्यात येईल याबाबतचा हक्क बँकेकडे राहील.

१५. सदरचे कर्ज वरील नियमाप्रमाणे पुर्तता करुन देणाऱ्या नियमित सभासदास अथवा बँक कर्मचाऱ्यास घेता येईल.

१६. सदर कर्ज **मंजुर/नामंजुर** करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील. मात्र कर्ज नामंजुरीबाबतचे कारण सभासदास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

**सदर कर्ज नियमावली संचालक मंडळ सभा दि.२३/०८/२०२० ठराव क्र. १६ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.२५/०८/२०२० पासुन लागु करण्यात येत आहे.**

(प्रकाश क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी

(अजित आव्हाड)
उपाध्यक्ष

(सुनिल बच्छाव)
अध्यक्ष